डॉ. मनोज नरेंद्र रेड्डी
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id:sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
एफ् – रोड, मुंबई – ४०० ०२०.
फोन क्र. ०२२ – २२८२ ६०२७ / २२८१ ७६९८

विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

परिपत्रक:–

जा.क्र.–क्र.क्रीडा/ 026 /२०24

दि. 22/08/ २०24

प्रति,
मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थाचे
प्राचार्य/संचालक तसेच विविध विभागातील संचालक/विभागप्रमुख
व प्रभारी संचालक यांना.

विषय: व्यायामशाळा आणि क्रीडांगण विकास अनुदान योजना २०२४–२५ च्या अंतर्गत प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ: 'जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांचे पत्र क्र. जा.क्र जिक्रीअमुंउ/व्याक्रीविअनुयो/२०२४/३८५ दि.२९/०७/२०२४

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक तसेच विविध विभागातील संचालक/विभागप्रमुख व प्रभारी संचालक यांना उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये कळविण्यात येते की, व्यायामशाळा आणि क्रीडांगण विकास अनुदान योजनेकरीता आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव हा महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामधील जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयात सादर करावे तसेच मुंबई उपनगर व्यतिरीक्त इतर कक्षेत येणाऱ्या महाविद्यालयांनी त्यांच्या कक्षेत येणारे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करुन महाराष्ट्र शासनाच्या व्यायामशाळा आणि क्रीडांगण विकास अनुदान योजना २०२४–२५ चा लाभ घ्यावा हि विनंती.

आपल्या माहितीस्तव महाराष्ट्र शासन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर चे परिपत्रक सोबत जोडत आहे.

धन्यवाद!

UNIVERSITY OF MUMBAI SPORTS & PHY. EDUN.

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर**
**शारीरिक शिक्षण महाविदयालय परिसर, संभाजीनगर समोर, आकुर्ली रोड,**
**कांदिवली (पुर्व), मुंबई ४००१०१.**

दुरध्वनी क्र. ०२२/२८८७११०५ ई मेल : dsomumbaisub2122@gmail.com& dsomumsuburb.dsys-mh@gov.in

जा.क्र. जिक्रीअमुंउ/व्याक्रीविअनुयो/२०२४/ 344 दिनांक -: २९/०७/२०२४

PA to R

प्रति,
मा. कुलसचिव,
मुंबई विदयापीठ, कक्ष क्रमांक १०६, पहिला मजला,
महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ४०००३२

UNIVERSITY OF MUMBAI
R/ICD/EOD/20
0 3 AUG 2024
9121

**विषय -: व्यायामशाळा आणि क्रीडांगण विकास अनुदान योजना २०२४ -२५.**
**मुंबई उपनगर जिल्हतातील प्रस्ताव सादर करणेबाबत.**

D(Sports Pavillion)

**संदर्भ -: १) व्यायामशाळा विकास अनुदान योजना शासन निर्णय दि. ०८/०१/२०१९.**
**२) क्रीडांगण विकास अनुदान योजना शासन निर्णय दि. ०७/०९/२०१९.**
**३) या कार्यालयाचे पत्र दि. १४/०६/२०२४ व ०५/०७/२०२४**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये व्यायामशाळा आणि क्रीडांगण विकास अनुदान योजनेंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडुन अनुदान देण्यात येते. सन २०२४ -२५ या वर्षाकरिता खालील अटी व शर्ती नुसार अनुदान अर्ज मागविण्यात येत आहेत.

## (१) योजनेचे नाव -: व्यायामशाळा विकास अनुदान योजना.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. क्रीडाधो- संकीर्ण/ प्र.क्र.- ४९/ क्रीयुसे १ दिनांक ८ जानेवारी २०१९, मंत्रालय, मुंबई ४०००२
**कार्यान्वयीन यंत्रणा** -: जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर.
**अनुदान मर्यादा** -: रुपये ७.०० लाख
**अनुदानाच्या बाबी** -: १) स्वतंत्र व्यायामगृहाचे बांधकाम करणे, २) अत्याधुनिक व्यायामसाहित्य खरेदी करणे, ३) व्यायामशाळा दुरुस्ती करणे अथवा नुतनीकरण करणे, ४) खुली व्यायामशाळा (open gym) उभारणे.

**अनुदान मंजुरीसाठी पात्रतेचे निकष आणि अटी व शर्ती -:**
**अनुदानासाठी पात्र संस्था** -: शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, कॅन्टोनमेंट बोर्ड), शासकीय रुग्णालये, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व उच्च शिक्षण विभाग यांनी मान्यता दिलेल्या शाळा – महाविदयालये, तसेच जिल्हा परिषद, आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग चालविण्यात येणारी सर्व शासकीय, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, आश्रमशाळा व वसतीगृह, शासकीय उपजिल्हा रुग्णालय, शासकीय जिल्हा

रुग्णालय, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय वैदयकीय महाविदयालय तसेच शासनाद्वारे मान्यता दिलेल्या शैक्षणिक शाळा व महाविदयालय यांना **शासनामार्फत अनुदान मिळण्यास प्रारंभ होऊन पाच वर्ष पुर्ण झालेली आहेत असे शाळा व महाविदयालये अनुदानासाठी पात्र राहतील.**

क्रीडा विभागाच्या विविध समित्या तसेच पोलीस कल्याण निधी / पोलीस विभाग, शासकीय कार्यालये, जिमखाना हे अनुदानासाठी पात्र ठरतील.

**अटी व शर्ती -:**

१) अर्जदार संस्थेकडे स्वत:च्या मालकीची अथवा दीर्घ मुदतीच्या करारावर (किमान ३० वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक) जागा असणे आवश्यक आहे.

२) ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, शासनाच्या विविध विभागामार्फत दाखल करण्यात येणा-या प्रस्तावासोबत अंदाजपत्रक, आराखडे, जागेच्या मालकीची कागदपत्रे व इतर हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३) बांधकामास ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांची परवानगी असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच संबंधित बाबींचे अंदाजपत्रक व आराखडे नोंदणीकृत अभियंता / नोंदणीकृत वास्तुशिल्पतज्ञ (आर्किटेक्ट) यांनी मान्य केलेले असावे.

**अनुदानासाठी अर्ज करण्याची पध्दत -:**

अनुदान मंजुरीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे सादर करावा.

## (२) योजनेचे नाव -: क्रीडांगण विकास अनुदान योजना.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. क्रीडाधो-३११३ संकीर्ण/ प्र.क्र.- ४८/ क्रीयुसे १ दिनांक ७सप्टेंबर २०१९, मंत्रालय, मुंबई ४०००२

**कार्यान्वियीन यंत्रणा -:** जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर.

**अनुदान मर्यादा -: रुपये ७.०० लाख आणि क्रीडा साहित्यासाठी रु. ३.०० लाख**

**अनुदानाच्या बाबी -:** १) क्रीडांगण समपातळीत तयार करणे, २) २०० मी. अथवा ४०० मी. धावनपथ (रनिंगट्रॅक) तयार करणे, ३) क्रीडांगणास भिंतीचे / तारेचे कुंपन घालणे, ४) विविध खेळाची एक किंवा अनेक प्रमाणित क्रीडांगणे तयार करणे, ५) प्रसाधनगृह / चेजिंग रुम बांधणे, ६) पिण्यासाठी व मैदानावर मारण्यासाठी आवश्यक पाण्याची सुविधा निर्माण करणे, ७) क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी भांडारगृह बांधणे ८) क्रीडांगणावर फ्लड लाईटची सुविधा निर्माण करणे, ९) क्रीडा साहित्य खरेदी करणे, १०) क्रीडांगणावर मातीचा अथवा सिमेंटचा भराव असलेली प्रेक्षक गॅलरी / आसनव्यवस्था तयार करणे, ११) प्रेक्षक गॅलरीवर / आसन व्यवस्थेवर शेड तयार करणे, १२) क्रीडांगणाभोवती ड्रेनेजची व्यवस्था करणे, १३) मैदानावर पाणी मारण्यासाठी स्प्रिंकलर यंत्रणा बसविणे व मैदानावर रोलिंग करण्यासाठी मिनी रोलर खरेदी करणे.

**अनुदान मंजुरीसाठी पात्रतेचे निकष आणि अटी व शर्ती -:**

**अनुदानासाठी पात्र संस्था -:** शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, कॅन्टोनमेंट बोर्ड), शासकीय रुग्णालये, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व उच्च शिक्षण विभाग यांनी मान्यता दिलेल्या शाळा – महाविदयालये, तसेच जिल्हा परिषद, आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग चालविण्यात येणारी सर्व

शासकीय, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, आश्रमशाळा व वसतीगृह, शासकीय उपजिल्हा रुग्णालय, शासकीय जिल्हा रुग्णालय, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय वैदयकीय महाविदयालय तसेच शासनाद्वारे मान्यता दिलेल्या शैक्षणिक शाळा व महाविदयालय यांना **शासनामार्फत अनुदान मिळण्यास प्रारंभ होऊन पाच वर्ष पुर्ण झालेली आहेत असे शाळा व महाविदयालये अनुदानासाठी पात्र राहतील.**

क्रीडा विभागाच्या विविध समित्या तसेच पोलीस कल्याण निधी / पोलीस विभाग, शासकीय कार्यालये, जिमखाना हे अनुदानासाठी पात्र ठरतील.

**अटी व शर्ती -:**
१) अर्जदार संस्थेकडे स्वत:च्या मालकीची अथवा दीर्घ मुदतीच्या करारावर (किमान ३० वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक) जागा असणे आवश्यक आहे.
२) ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, शासनाच्या विविध विभागामार्फत दाखल करण्यात येणा-या प्रस्तावासोबत अंदाजपत्रक, आराखडे, जागेच्या मालकीची कागदपत्रे व इतर हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
३) बांधकामास ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांची परवानगी असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच संबंधित बाबींचे अंदाजपत्रक व आराखडे नोंदणीकृत अभियंता / नोंदणीकृत वास्तुशिल्पतज्ञ (आर्किटेक्ट) यांनी मान्य केलेले असावे.

**अनुदानासाठी अर्ज करण्याची पध्दत -:**
अनुदान मंजुरीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे सादर करावा.

**वरील अटी व शर्तींची पुर्तता करण्या-या शाळा, कनिष्ठ महाविदयालये आणि महाविदयालये, स्थानिक स्वराज्य संस्था इ. नी विहीत नमुन्यातील अर्ज आणि आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज लवकरात लवकर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबधिताना सुचित करण्यात यावे अशी विनंती आहे.**

आपली विश्वासू,
Balvi
(वर्षा साळवी)
जिल्हा क्रीडा अधिकारी
मुंबई उपनगर

प्रत माहितीस्तव आणि कार्यवाहीस्तव सविनय सादर -:
१) मा. उपकुलसचिव, मुंबई विदयापीठ, विदयानगरी, कलिना, सांताक्रुझ (पु), मुंबई ४०००९८.
२) मा. संचालक, क्रीडा, मुंबई विदयापीठ, "फ" पथ, मरीन लाईन्स, मुंबई ४०००२०.